# प्रेस रिलीज

## पवनउर्जेचा पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत कडक निर्बंध, कायदे करण्याची गरज : सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हरॉनन्मेंट (सीएसई) च्या अभ्यासाचा निष्कर्ष

१) सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हरॉनन्मेंट (सीएसई) ने आयोजित केलेल्या 'ग्रीन नॉर्मस फॉर विंड एनर्जी' (पवनउर्जेसाठी हरित नियम) या एकदिवसीय कार्यशाळेत पर्यावरणावर पवनउर्जेच्या विकासाचा होणारा परिणाम, विषेषतः देशभरातील जंगलांवर होणाऱ्या परिणामांबाबत प्रामुख्याने चर्चा झाली.

२) पुण्यात झालेल्या या कार्यशाळेत पवनउर्जेवर सीएसइने केलेल्या अहवाल प्रकाशित करण्यात आला यामध्ये जगभरातील विविध देशांनी पवनउर्जेबाबत पर्यावरणावर होणाऱ्या परिणांमाबाबत काय उपाययोजना केली आहे याची चर्चा केली आहे.

३) भारत हा जगातील एकमेव असा देश आहे की जो पवनऊर्जेच्या वापराबाबत आघाडीवर आहे. मात्र याचे पर्यावरणावर होणारे विपरित परिणाम रोखण्यासाठी भारतातच कमी हरित नियम असल्याचे या अभ्यासात स्पष्ट झाले आहे.

४) केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडे १९८० पासून असलेल्या माहितीनुसार पवनऊर्जेसाठी तब्बल ३९३२ हेक्टर क्षेत्र वापरले जात आहे. मात्र पर्यावरणावर याचा कोणता परिणाम (इआयए) होईल याचा अभ्यास न करताच हे क्षेत्र वापरले जात आहे.
५) गेल्या सात वर्षांत पवनऊर्जेसाठी वन जमीनीचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे.
६) पवनऊर्जेच्या वापरासाठी कडक हरित नियम असावेत तसेच पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी एन्व्हरॉनन्मेंटल इंम्पॅक्ट अॅसेसमेंट (ईआयए) बंधनकारक करावे अशी शिफारस 'सीएसई'च्या अभ्यासाद्वारे करण्यात येत आहे.

पुणे , ता. ३ः हरितऊर्जेपैकी एक असलेल्या पवनऊर्जेमुळे परिस्थितीकीवर , पर्यावरणावर मोठ्या प्रमाणात परिणाम होतो असा निष्कर्ष दिल्लीतील सीएसई (सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हरॉनन्मेंट) या संस्थेने आज प्रकाशित केलेल्या अहवालात मांडला आहे. 'यशदा'मध्ये बुधवारी ता. ३ जुलै रोजी सीएसईने आयोजित केलेल्या 'ग्रीन नॉर्मस फॉर विंड एनर्जी' (पवनउर्जेसाठी हरित नियम) या एकदिवसीय कार्यशाळेत हा अहवाल प्रकाशित करण्यात आला.
या अहवालात महाराष्ट्रासह देशभरातील विविध ठिकाणी पवनऊर्जेचा पर्यावरणावर कोणता परिणाम झाला याबाबतची सविस्तर माहिती संकलित करण्यात आली आहे.
यावेळी बोलताना 'सीएसई'चे उपसंचालक चंद्रभूषण म्हणाले,''जर पवनऊर्जा प्रकल्प मानवी वस्तीशेजारी उभारण्यात आला तर त्याचे आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. डोगरावर किंवा वनक्षेत्रावर जर पवनऊर्जा प्रकल्प ऊभारल्यास त्याचे जैविकतेवर तसेच जलस्त्रोतावर विपरित परिणाम होतात. त्या तुलनेच सपाट प्रदेशात ऊभारलेल्या प्रकल्पामुळे कमी परिणाम होत असल्याचे आम्हाला आढळले आहे.

**वेगाने वाढ**

गेया दहा वर्षांत देशात पवन ऊर्जेच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. मार्च २०१३ च्या अखेरपर्यंत देशातील पवनऊर्जा प्रकल्पांतून १९,०५१ मेगा वॅट वीजनिर्मिती होत होती. जगात भारताचा पाचवा क्रमांक लागतो. देशात वीजनिर्मितीमध्ये कोळसा आणि हायड्रोपॉवरच्या खालोखाल पवनऊर्जेचा वापर केला जातो. सन २०११-१२ मध्ये एकूण २३.४ दशलक्ष युनिट वीजेची पवनऊर्जेतून निर्मिती करण्यात आली. चार कोटी नागरिकांना ही उपयोगी ठरू शकते.
बाराव्या पंचवार्षिक योजनेत सन २०१२ ते २०१७ याकाळात १५,००० मेगावॅट पवनऊर्जा निर्मितीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे पवनऊर्जेचे प्रमाण जवळजवळ दुप्पट होणार आहे. १.५ मेगा वॅट क्षमतेचे विंड टर्बाईन आहे असे गृहीत धरल्यास आगामी पाच वर्षांत देशात १० हजार नवे टर्बाईन्स बसविले जातील. झपाट्याने वाढणाऱ्या या ऊर्जेमउळे पर्यावरणावर होणारे परिणाम नियंत्रित करायचे झाल्यास चांगले पर्यावरणीय निकष असण्याची सध्याच्या काळाची नितांत गरज असल्याचे या अहवालात

नमूद करण्यात आले आहे.
सध्या देशाच्या दोन विभांगात प्रामुख्याने पवनऊर्जा प्रकल्प ऊभारण्यात आले आहेत. यामध्ये दक्षिणकडील तमिळनाडू, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश तर पश्चिमेकडील महाराष्ट्र, राजस्थान आणि गुजरात या राज्यांचा समावेश होतो.
देशातील एकूण पवनऊर्जा निर्मितीत एकटा तमिळनाडूचाच वाटा ४० टक्के आहे. तमिळनाडूत पुरेशी ग्रीड क्षमता नसल्याने विंड डेव्हलपर्स आता कर्नाटक आणि महाराष्ट्राकडे वळले आहेत. या दोन राज्यात विंड डेव्हलपर्स प्रामुख्याने जंगल किंवा वनक्षेत्रात हे प्रकल्प उभे करीत आहेत.

## जंगलाकडे कल

केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाकडे १९८० पासून असलेल्या माहितीनुसार पवनऊर्जेसाठी तब्बल ३९३२ हेक्टर क्षेत्र वळविण्यात आले आहे किंवा वापरले जात आहे. पवन ऊर्जा प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्यांसाठी तसेच वीज वहनाच्या लाईन टाकण्यासाठी वापरलेली वनजमिन यामध्ये धरण्यात आलेली नाही. पवनऊर्जा प्रकल्पांसाठी कर्नाटकात (५७ टक्के) तर महाराष्ट्रात (३१ टक्के) अशी एकूण ८८ टक्के वनक्षेत्राची जमीन वापरण्यात आली आहे.
गेल्या सात वर्षांत पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी वनजमिनीची मागणी उद्योजकांकडून सातत्याने वाढत असल्याचे सीएसईच्या अभ्यासात आढळून आले आहे. एप्रिल २००६ आणि मार्च २०१३ या कालावधीत ३४५४ हेक्टर वनजमीन पवनउर्जा प्रकल्पांसाठी वापरण्यात आली किंवा वळविण्यात आली. गेल्या २६ वर्षांत (१९८० ते मार्च २००६) या कालावधीत केवळ ४७८ हेक्टर वनक्षेत्र पवनऊर्जा प्रकल्पासाठी घेतले होते.
सर्वांत महत्वाची बाब म्हणजे पर्यावरणीय दृष्ट्या अतिशय संवेदनशील असेलल्या उदाहरणार्थ वाईल्डलाईफ सँच्युरी सारखे क्षेत्रही कोणत्याही प्रकारचा 'ईआयए' अभ्यास न करता वापरले असल्याचे 'सीएसई'च्या अभ्यासातून स्पष्ट होते. 'सीएसई'ने सर्व पवनऊर्जा प्रकल्पांचा अभ्यास केला. यामध्ये काही बाबी निदर्शनास आल्या. त्या म्हणजे पवनऊर्जा प्रकल्पांना तात्विक मान्यता मिळण्यासाठी महिन्यापेक्षा कमी कालावधी लागलेला आहे. सर्वात कमी कालावधी दहा दिवसांचादेखील आहे. पवनऊर्जेसाठी वन विभागाची अंतिम मान्यता मिळण्यासाठी सर्वसाधारणपणे  ७.५ महिने लागले.''इतक्या अल्प कालावधीत पर्यावरणाच्या संभाव्य परिणामांचा अभ्यास केवळ अशक्य आहे. त्यामुळे पवनऊर्जा प्रकल्पांचा जंगलातील जैविकतेवर काय परिणाम होतो हे समजून न घेताच बहुतांश वनजमीन अशा प्रकल्पांसाठी हस्तांतरीत करण्यात आली आहे,'' असे चंद्र भूषण यांनी स्पष्ट केले.

## हरित नियम

पवन ऊर्जा प्रकल्पासांठी जगात कोणते नियम, अटींचा वापर केला जातो याचा 'सीएसई'ने अभ्यास करुन त्याचे संकलन केले. भारत हा जगातील एकमेव असा देश आहे की जो पवनऊर्जेच्या वापराबाबत आघाडीवर आहे. मात्र याचे पर्यावरणावर होणारे विपरित परिणाम रोखण्यासाठी भारतातच कमी हरित नियम आहेत असे सीएसईतील संसोधक कंचन कुमार आगरवाल यांनी यावेळी सांगितले.
१०० मेगावॅट क्षमतेच्या मोठ्या पवन ऊर्जा प्रकल्पांसाठीदेखील ङ्गईआयएफअभ्यास आवश्यक केलेला नाही.

चंद्रभूषण म्हणाले, ''पवनऊर्जेच्या जैवविविधतेवरील परिणामांचा अभ्यास व संकलन देशातील संशोधकांनी गेल्या काही वर्षांत सुरु केले आहे. पवनऊर्जेमुळे वन्यजीवन, पाण्याचे स्त्रोत तसेच जंगलाची परिसंस्था यावर काय परिणाम होतो याचा अजूनही अभ्यासच झालेला नाही. हा एक महत्वाचा प्रश्न आहे असे देशातील नियंत्रण करणाऱ्या संस्था तसेच ऊद्योगांना वाटतही नाही. या क्षेत्रात जर शाश्वत विकास करावयाचा असेल तर हे बदलण्याची गरज आहे.''

**पुढे काय..**

जगात सध्या सुरु असलेल्या विविध पद्धतींचा वापर करुन 'सीएसई'ने आपला अहवाल तयार केला आहे. पवन ऊर्जेच्या शाश्वत वाढीसाठी भारताने कडक हरित नियमांची अंमलबजावणी करायला हवी असे 'सीएसई'च्या अभ्यासकांना वाटते. त्यासाठी सुचविलेल्या काही शिफारसी :

१) सर्व संभाव्य पवनऊर्जा प्रकल्पाच्या ठिकाणांसाठी अपारंपारिक ऊर्जा मंत्रालयाने 'स्टॅटर्जिक इंम्पॅक्ट ॲसेसमेंट स्टडी' करावा. या अभ्यासावर आधारित असा पवनऊर्जा विकास आराखडा तयार करावा.
२) मोठ्या पवनऊर्जा प्रकल्पांसाठी 'ईआयए' आणि 'एन्व्हरॉन्मेंट मॅनेजमेंट प्लॅन.' (ईएमपी) बंधनकारक करावेत.

३) नागरिकांवर होणाऱ्या संभाव्य आरोग्यविषयक परिणामांबात निकष निश्चित करावेत.
४) या प्रकल्पातून तयार होणाऱ्या वीजेवर तेथील लोकांचा पहिला अधिकार आहे. याबाबत लोकांत जागृती करावी. तसेच या प्रकल्पातील फायद्यातील वाटा तेथील स्थानिक लोकांनाही द्यावा.
५) जमिनीच्या वापराबाबत निकष निश्चित करावेत.

या विषयावर अधिक माहितीसाठी तसेच मुलाखतींसाठी कृपया शीबा मदान ( ०८८६०६५९१९०) किंवा कंचन कुमार अग्रवाल (०८८८२८३९७५९) यांच्याशी संपर्क साधावा.